राष्ट्रीय सहकार विकास निगमने महाराष्ट्र शासनामार्फत (Routed Through State Government) राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना दिलेल्या कर्जाचा विनियोग तपासून शासनास अहवाल सादर करण्याकरीता स्थापन समिती पुर्नगठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक : ससाका-१०२५/प्र.क्र. १५९/३-स
दालन क्र. ६२०, ६ वा मजला, विस्तार इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १० ऑगस्ट, २०२६.

वाचा:-

शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. ससाका-१०२५/प्र.क्र.१५९/३-स, दि.०६.०१.२०२६.

शासन निर्णय:

राष्ट्रीय सहकार विकास निगमने महाराष्ट्र शासनामार्फत राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना दिलेल्या कर्जाचा साखर कारखान्यांनी केलेला विनियोग तपासून कर्जाच्या विनियोगात उल्लंघन केलेल्या सहकारी साखर कारखान्यांबाबत कार्यवाही करण्याची शासनास शिफारस करण्याकरीता संदर्भीय शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीमध्ये अंशत: बदल करुन पुढीलप्रमाणे समिती पुर्नगठीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१)	साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे	- अध्यक्ष
२)	सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे	-सदस्य
३)	संबंधित प्रादेशिक सहसंचालक (साखर)	- सदस्य
४)	संचालक (अर्थ)साखर आयुक्त कार्यालय ,	- सदस्य सचिव

२. सदर समिती कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहिल.

सदर समितीने NCDC यांनी कर्ज मंजूर करतांना घातलेल्या अटी, त्यासंबंधीच्या शासन निर्णयातील अटी शर्ती, तसेच NCDC यांचे कर्ज महाराष्ट्र शासनामार्फत मंजूर करण्याबाबतच्या राज्य शासनाच्या धोरणानुसार मंजूर करण्यात आलेल्या कर्ज निधीचा संबंधित कारखान्याकडून सुयोग्य विनियोग होत आहे किंवा कसे? करण्यात आलेल्या विनियोगामध्ये घेतलेल्या कर्जाचा गैरवापर करण्यात आला आहे किंवा कसे? याबाबत संबंधित सहकारी साखर कारखान्यांची तपासणी करावी व राष्ट्रीय सहकार विकास निगम

यांनी नोंदविलेल्या निरिक्षणांच्या अनुषंगाने कारखानानिहाय मुद्दयांबाबतची माहिती शासनास सादर करावी.

तसेच, सदर तपासणीअंती कर्जाच्या विनियोगात गैरवापर आढळून येत असलेल्या आणि NCDC यांनी जून २०२५ मध्ये केलेल्या तपासणीमध्ये त्यांना कर्जाच्या विनियोगात गैरवापर केल्याचे आढळून आलेल्या साखर कारखान्यांविरुध्द करावयाच्या कारवाईबाबत शासनास शिफारस करावी.

३. सदर समितीने दोन आठवड्यांत शासनास अहवाल सादर करावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१०१७४२२८६०४७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANKUSH PANDURANG SHINGADE

Digitally signed by ANKUSH PANDURANG SHINGADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=0619305C0A0825664EFA457FFA51C3F2364841C81F8C437078A333B7111446A2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E11F71FCAC231B0F91F430636DE14F6C49B569D173346155B9208DCD97DD078B, cn=ANKUSH PANDURANG SHINGADE
Date: 2026.08.10 17:43:34 +05'30'

(अंकुश शिंगाडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-४११००५.
२) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) संचालक (अर्थ), साखर आयुक्तालय, साखर संकुल, पुणे.
४) सर्व प्रादेशिक सहसंचालक (साखर)

प्रत:-

१) निदेशक (चीनी), राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC), ४-सिरी इन्स्टीट्युशनल एरीया, हौज खास, नवी दिल्ली-११००१६.
२) निवड नस्ती (३-स).